| ६ | जमीन प्रकरणे अभिप्राय देवून शासनांस सादर करणे. |
|---|---|
| | शाळेच्या इमारत व क्रीडांगणासाठी जमीन मंजूर करण्याबाबत शासन परिपत्रक क्रमांक-माशाज ११०२/(२४८/२००२)/माशि-३, दिनांक-१२ सप्टेंबर, २००२ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ या स्तरावर कार्यवाही करण्यात येते. शासनाकडून किंवा मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महसूल शाखा यांचेकडून या कार्यालयास जागा मागणी संदर्भात अभिप्राय/शिफारशीसह अहवालाची मागणी केली जाते. त्यानंतर या पत्रानुसार ज्या जिल्ह्यातील जागा मागणी आहे त्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांना या कार्यालयीन स्तरावरुन सूचित करण्यात येऊन खालील दर्शविलेल्या १ ते १३ मुद्द्यांबाबतचा अहवाल दोन प्रतीत मागणी करण्यात येतो. तसेच संस्थेच्या शैक्षणिक प्रयोजनासाठी एकूण किती जागेची आवश्यकता आहे याबाबतची माहितीही स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह / शिफारशीसह शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचेकडून मागविण्यात येते. |
| | **शासन परिपत्रक क्रमांक-माशाज ११०२/(२४८/२००२)/माशि-३, दिनांक-१२ सप्टेंबर, २००२ अन्वये १ ते १३ मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.** <br> **WWW.maharashtra.gov.in** |

| | |
|---|---|
| १ | संस्थेमार्फत चालविण्यात येणारी शाळा अनुदान संहिता मान्यताप्राप्त आहे का ? असल्यास शासनाने केव्हा मान्यता दिली आहे, त्याचा तपशील. |
| २ | शाळा विस्ताराकरिता शासनाने मंजूरी दिली आहे का, किंवा शाळेचे विस्ताराची आवश्यकता आहे का ? |
| ३ | बांधकाम व अन्य यासाठी संस्थेची सध्याची आर्थिक स्थिती कशी आहे याबाबत सविस्तर माहिती पाठविताना संस्थेच्या खाती जमा, मुदत ठेव, विकास निधी, इत्यादी बाबतचा तपशील पाठवावा. |
| ४ | प्रस्तुत प्रयोजनासाठी संस्था/शाळेकडे उपलब्ध असलेल्या जागेचा/इमारतीचा तपशील तसेच एकूण किती जमीन आवश्यक आहे याचा तपशील. |
| ५ | सदर शाळेच्या जवळपास इतर शासनमान्य अनुदानित कोणत्या माध्यमाच्या शाळा आहेत आणि त्यांची भौतिक सुविधा कशी आहे ? प्रस्तावित शाळेला विचाराधीन जमीन उपलब्ध न झाल्यास पर्यायी व्यवस्था काय असेल याबाबत सविस्तर अभिप्राय द्यावेत. |
| ६ | शाळेतील विद्यार्थ्यांची वर्गवारी सरासरी उपस्थिती, वार्षिक तपासणी अहवालाची शिक्षणाधिकारी यांच्या अभिप्रायांसह प्रत व मागील तीन वर्षांची शालांत परीक्षेची टक्केवारीबाबत माहिती. |
| ७ | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या सेवाशर्तीनुसार आहेत किवा कसे याचा तपशील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यात आला आहे किंवा कसे ? |
| ८ | नियुक्त केलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता यादी, सेवापुस्तके अद्ययावत आहेत किंवा कसे ? |
| ९ | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी व व्यवस्थापनात वाद आहेत किंवा कसे ? असल्यास, तपशील. (शाळा न्यायाधिकरणातील प्रलंबित प्रकरणांचा तपशील.) |
| १० | संस्था/शाळा यांचेकडून कोणते शासकीय येणे बाकी आहे व असल्यास त्याबाबत तपशील, संस्था प्रतिवर्षी लेखा परीक्षण अहवाल नियमितपणे पाठविते किंवा कसे याबाबतचा तपशील. |
| ११ | संस्था/शाळा यांचेविरुध्द काही तक्रारी आल्या असल्यास त्याबाबत शिक्षणाधिकारी तसेच शिक्षण उपसंचालक यांच्या स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील. |
| १२ | संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची अद्ययावत यादी. |
| १३ | अन्य इतर आवश्यक माहिती. |